जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2018
सकाळ

# सुवर्णमहोत्सवी संशोधन शिष्यवृत्तीत वाढ होणार

## व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठ सुवर्णमहोत्सवी संशोधन शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्यास व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता दिली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.

बैठकीत जीवरसायनशास्त्र अधिविभागात इन्क्युबेशन सेंटर सुस्थापित करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच कन्सल्टन्सी सर्व्हिसेसबाबत धोरण ठरविण्याच्या अनुषंगाने स्थापन केलेल्या समितीचा ॲप्लिकेशन प्रोफोर्मा व गाइडलाईन्स लागू करण्यास मान्यता देण्यात आली. २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील व सत्रारंभ व समाप्तीच्या निश्‍चित केलेल्या तारखा मंजूर करण्यात आल्या. त्याचबरोबर २०१६-१७ वार्षिक गुणवत्ता अहवाल नॅककडे (बंगळूर) सादर करण्यास मान्यता देण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नोटिफिकेशननुसार महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या



पुनर्नियुक्तीसाठी पीअर रिव्ह्यू कमिटी संलग्नित महाविद्यालयांना लागू करण्यास मंजुरी देण्यात आली. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

30 APR 2018 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ 'नॅनो सायन्स'च्या पहिल्याच बॅचचा धमाका !

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या विशेष अनुदानातून शैक्षणिक वर्ष २०१२-१३पासून सुरू करण्यात आलेल्या स्कूल ऑफ नॅनो-सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी या अधिविभागाची बी. एस्सी. - एम्. एस्सी. (एकत्रित) अभ्यासक्रमाची पहिली बॅच सन २०१६ - १७ मध्ये उत्तीर्ण होऊन बाहेर पडली आहे. या पहिल्या बॅचच्या अनेक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले संशोधनातील कसब सिद्ध करून घवघवीत यश मिळविले आहे. त्यांच्या या यशामुळे हा अभ्यासक्रम सुरू करण्याचा विद्यापीठाचा निर्णय अत्यंत योग्य असून तो पथ्यावर पडला असल्याचे स्पष्ट झाले आहे, असे मत स्कूल ऑफ नॅनो-सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजीचे समन्वयक तथा विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.एस. पाटील यांनी व्यक्त केले. विद्यापीठाच्या नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागाच्या या पहिल्या पंचवार्षिक बॅचच्या कामगिरीचा आढावा घेताना ते बोलत होते.



- बी.एस्सी. व एम. एस्सी.च्या पहिल्या बॅचचे यश
- पदवी स्तरावरच दिग्विजय पाटीलला दोन पेटंट
- दरवर्षी दहा विद्यार्थ्यांना संशोधन फेलोशीप मिळणार

यावेळी डॉ. पाटील म्हणाले, एम्.एस्सी.च्या शेवटच्या वर्षातील दहा विद्यार्थ्यांनी त्यांच्या संशोधन प्रकल्पाच्या दरम्यान दहा आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांमध्ये आपले शोधनिबंध प्रकाशित केले. या विद्यार्थ्यांपैकी सात विद्यार्थ्यांची निवड दक्षिण कोरिया आणि तैवान येथील विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये पीएच.डी. साठी झाली. त्यात नवाज मुलाणी (हॅनयॉंग नॅशनल युनिव्हर्सिटी, दक्षिण कोरिया), प्रवीण पवार, विजय पाटील आणि ऋतुराज पाटील (चोन्नम नॅशनल युनिव्हर्सिटी, दक्षिण कोरिया), रोहन पास्ते आणि मानसी हुपरीकर (नॅशनल डॉंग हौ युनिव्हर्सिटी, तैवान), प्रितम पाटील (म्यॉंगजी नॅशनल युनिव्हर्सिटी, दक्षिण कोरिया), पान ४ पहा

## विद्यापीठाच्या 'नॅनो सायन्स' च्या पहिल्याच बॅचचा धमाका !

पान १ वरुन

यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांचे संशोधनातील योगदान पाहता कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी विद्यार्थ्यांचे चांगले संशोधन प्रकाशित करण्यासाठी दरवर्षी दहा विद्यार्थ्यांना संशोधन फेलोशिप देऊ केली आहे.

याखेरीज विभागातील आठ विद्यार्थ्यांची 'स्प्रिंगर नेचर' सारख्या आंतरराष्ट्रीय प्रकाशन समुहात 'सायन्टिफिक रायटर' या पदावर नियुक्ती झाली आहे. त्यात राहुल टिक्के, काजल चौगुले, वैष्णवी सुतार, ऋषीकेश गुरव, असिफ मुजावर, सुयोग माने, प्रितीलता जाधव आणि सुदर्शन पाटील यांचा समावेश आहे. तसेच नीलम यादव या विद्यार्थिनीस पॅरिस एसयुडी युनिव्हर्सिटीची अत्यंत प्रतिष्ठेची 'इरॅस्मस मुंडस' फेलोशीप मिळाली आणि ती सध्या तेथे एम.एस. करीत आहे. शुभदा पाटील या विद्यार्थिनीची जेम्स वॅट नॅनो फॅब्रीकेशन सेंटर येथे एम.एस. या पुढील शिक्षणासाठी निवड झाली आहे. येणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून विभागात एम.फिल. आणि पीएच.डी. अभ्यासक्रमही सुरु होत आहे.

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती वाढण्यासाठी विभागामार्फत करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची माहिती देताना डॉ. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला आणि संशोधनवृत्तीला चालना देण्यासाठी विभागात पदवी स्तरापासूनच लघु-संशोधन प्रकल्प राबवले जातात. बी. एस्सी. भाग-१ साठी 'प्रेरणा' बी.एस्सी. भाग-२ साठी 'कल्पना', बी.एस्सी. भाग-३ 'सृजन' एमू.एस्सी. भाग-१साठी 'निर्मिती' अशा उपक्रमांतून लघुप्रकल्प राबवून विद्यार्थ्यांना संशोधनास व पेटंट (स्वामीत्व हक्क) फाईल करण्यास प्रोत्साहित केले जाते. त्याचेच फलित म्हणून समाजास उपयुक्त अशा संशोधनासाठी धनश्री साबळे या विद्यार्थिनीला 'गॅस सेन्सर' निर्मितीसाठी 'झी-२४ तास यंग इनोव्हेटर अवॉर्ड' मिळाले, तर अजित पवार या विद्यार्थ्याला 'वॉटर प्युरिफिकेशन'साठी मराठी विज्ञान परिषदेच्या संशोधन महोत्सवात प्रथम क्रमांक मिळाला. पदवीच्या दुसऱ्या वर्षातील दिग्विजय पाटील याने चामडी चप्पलला हायड्रोफोबिक कोटींग आणि गणित विषयात नवीन फॉर्म्युला मांडला. पदवी शिक्षणाच्या कालावधीतच त्याने दोन पेटंटस् स्वतःच्या नावावर केली आहेत.

विद्यार्थ्यांची तयारी कशा प्रकारे करून घेतली जाते, याविषयी सांगताना डॉ. पाटील म्हणाले, जागतिक पातळीवरील प्रतिष्ठेच्या डी.ए.ए.डी. (जर्मनी), युरोपमधील इरॅस्मस मुंडस, मेरी क्युरी, अमेरिकेतील रामन, जपान सोसायटी फॉर प्रमोशन ऑफ सायन्स (जेएसपीएस), नॅशनल इन्स्टिटयूट फॉर मटेरियल सायन्स (एनआयएमएस) दक्षिण कोरियाची ब्रेन पुल, सिंगापूरमधील नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ सिंगापूर (एनयुएस), ऑस्ट्रेलियाची व्हाईस चान्सलर (व्हीसी) फेलोशीप तसेच इतर मानाचे विद्यावेतन मिळवण्यासाठी अधिविभागामध्ये मार्गदर्शन केले जाते. या फेलोशीपचे सर्वसाधारण विद्यावेतन एक हजार ते दीड हजार अमेरिकी डॉलर प्रतिमाह इतके असते. हे विद्यावेतन मिळवण्यासाठी टीओईएफएल, आयईएलटीएस परीक्षांविषयक मार्गदर्शन करण्यावर विशेष भर दिला जातो. या प्रशिक्षणातून इंग्रजी विषयातील लेखन, वाचन व समज येण्यास मदत होते. या महत्त्वाच्या विद्यावेतनाद्वारे पीएच.डी. केल्यास पोस्ट डॉक्टरेटसाठी भरीव विद्यावेतन (३०००-४००० अमेरिकी डॉलर प्रतिमाह) मिळू शकते, असेही त्यांनी नमुद केले.

डॉ. पाटील पुढे म्हणाले, शैक्षणिक वर्ष २०१६-१७मध्ये आयईएलटीएस या परीक्षेमध्ये नॅनो सायन्स विभागाचे पाच विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यामुळे त्यांना युरोप आणि इतर विकसित देशांमध्ये पीएच.डी.साठी प्रवेश मिळविणे शक्य झाले आहे. या माध्यमातून संशोधनाचा भरपूर अनुभव प्राप्त करुन नामवंत शास्त्रज्ञ होता येते किंवा स्वत:च्या उद्योगाची निर्मितीही करता येते. त्या दृष्टीने भविष्यात विद्यार्थ्यांना आंत्रप्रेन्युअरशीपमार्फत रोजगार निर्मिती करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा विचार असल्याचेही त्यांनी सांगितले.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरु डॉ.डी.टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली हा विभाग आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन करीत असून अभियांत्रिकी, फार्मसी, टेक्स्टाईल, डेंटीस्ट्रीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कन्सल्टन्सीमार्फत मार्गदर्शन केले जाते. इतर विद्यार्थ्यांना अधिविभागातील उपकरणांचा संशोधनासाठी उपयोग करुन घेता यावा, याकरिता नॅनो सायन्स इन्स्ट्रुमेंटेशन फॅसिलिटी सेंटर (एनआयएफसी)ची स्थापना करण्यात आली असल्याचेही डॉ. पाटील यांनी सांगितले.

### प्रवेश परीक्षेचे ऑनलाईन अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजीची प्रवेश क्षमता ही ६० विद्यार्थी इतकी असून इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षा देणे अनिवार्य आहे. अधिविभागात बी.एस्सी.-एमू.एस्सी. (एकत्रित) पाच वर्षांच्या प्रवेशासाठी बारावी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर ३ मे ते १६ जून २०१८पर्यंत उपलब्ध करुन दिले जातील. प्रवेश परीक्षा २५ जून २०१८ रोजी स्कूल ऑफ नॅनो सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी ०२३१-२६०९४९० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले आहे.